# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date – 22 December 2024

# Time 01.00 to 01.05 PM

# Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

# प्रादेशिक बातम्या

# दिनांक २२ डिसेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

रोजगार मेळाव्या अंतर्गत पंतप्रधान उद्या केंद्र सरकारच्या विविध विभागांमध्ये नव्यानं नियुक्त केलेल्या उमेदवारांना ७१,००० हून अधिक नियुक्ती पत्रांचं वितरण करणार आहेत. यावेळी ते उमेदवारांना संबोधितही करणार आहेत. रोजगार मेळावा हा पंतप्रधानांच्या रोजगार निर्मितीला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या वचनाची पूर्तता करण्याच्या दिशेनं एक पाऊल आहे. हा उपक्रम युवकांना राष्ट्रनिर्माणाबरोबरच आत्मनिर्भर होण्याची संधी उपलब्ध करून देईल, असं सरकारतर्फे कळवण्यात आलं आहे.  हा रोजगार मेळावा  देशभरातील ४५ ठिकाणी आयोजित केला जाणार आहे. केंद्रीय सरकारच्या विविध मंत्रालये आणि विभागांसाठी भरती केली जात आहे. देशभरातून निवडलेले नवे उमेदवार गृह मंत्रालय, टपाल कार्यालय, उच्च शिक्षण विभाग, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग यांसारखी विविध मंत्रालये/विभागांमध्ये नियुक्त होतील.

****

भारत पाच ट्रिलियन-डॉलर अर्थव्यवस्थेचं उद्दिष्ट साध्य करताना महाराष्ट्रही देशात अग्रेसर राहील, असं राज्याच्या मंत्री आदिती तटकरे यांनी म्हटलं आहे. केंद्रीय अर्थमंत्री सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली काल जैसलमेर इथं केंद्रीय अर्थसंकल्पपूर्व बैठक झाली त्यावेळी तटकरे बोलत होत्या. यात २०२५-२६ च्या प्रस्तावित केंद्रीय अर्थसंकल्पातील निधी वाटप, दृष्टिक्षेपासह विविध मागण्यांवर राज्यांच्या अर्थमंत्र्यांमध्ये  चर्चा झाली. तटकरे यांनी महाराष्ट्रातील कृषी, आरोग्य,

पायाभूत सुविधांससह विविध विकास धोरणांबाबत शासनाच्या प्रस्तावांची रूपरेषाही यावेळी मांडली.

राज्यात चालू गाळप हंगामात उपलब्ध सर्व ऊसाचं सर्वसाधारणपणे दीडशे  दिवसांत गाळप होईल एवढी साखर कारखान्यांची स्थापित गाळप क्षमता वाढली

असल्याची माहिती नांदेड प्रादेशिक साखर उपसंचालक कार्यालयानं दिली आहे. कार्यालयामार्फत ऊस गाळपासंदर्भात नियमित आढावा घेतला जाणार असून कोणत्याही शेतकऱ्याचा ऊस शिल्लक राहणार नाही असं नियोजन केलं जात असल्याचं कार्यालयानं कळवलं आहे. हिंगोली जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक रोखण्याच्या उद्देशानं प्रत्येक कारखान्यासाठी एका तक्रार निवारण अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याचंही कार्यालयानं म्हटलं आहे. ऊस तोडणीवेळी शेतकऱ्यांची अडवणूक होऊ नये यासाठी सर्व कारखान्यांनी दक्षता घेण्याच्या सूचना कार्यालयानं दिल्या आहेत.

****

मासेमारी करणाऱ्यांनाही किसान क्रेडीट कार्डचा लाभ घेता येणार आहे. मासेमारी करणारे मच्छिमार, मत्स्यकास्तकार यांना ही सुविधा उपलब्ध करुन देण्यासह प्रधानमंत्री मत्स्य किसान सह–समृद्धी योजनेअंतर्गत मत्स्य व्यावसायिक, मच्छिमार सहकारी संस्था आदींची नोंदणीही करण्यात येत आहे. १५ मार्च २०२५ पर्यंत याबाबतची मोहिम राबविण्यात येत आहे. यासाठी छत्रपती संभाजीनगरच्या दुग्ध व्यवसाय विकास विभाग इमारतीतल्या मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त कार्यालयाशी संपर्क करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

****

राज्यात गेल्या २४ तासांत  बहुतांश ठिकाणी किमान तापमान १५ अंशांच्या वर होतं. आजही हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. राज्यात या सरत्या वर्षाच्या शेवटापर्यंतच्या आठ दिवसांच्या कालावधीत बहुतांश भागात वातावरण काही अंशी ढगाळ असणार आहे तर काही ठिकाणी तुरळक पावसाचीही अंशत: शक्यता आहे.मात्र,देशाच्या उत्तरेकडील बहुतांश पर्वतीय

भागात थंडीची तीव्र लाट येण्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे.

दरम्यान, सूर्याच्या उत्तरायणाला काल २१ डिसेंबरला प्रारंभ झाला. इथून पुढे हळूहळू दिवसाचा कालावधी वाढत जातो. सूर्य काल मकरवृत्तावर असल्यानं कालचा सेंबरचा दिवस हा सर्वात लहान म्हणजे अकरा तासांचा तर, रात्र तेरा तासांची होती. उत्तर गोलार्धात हिवाळा सुरू झाल्यानंतर दिवस लहान तर रात्र मोठी होते.

****

भारतानं, १९ वर्षांखालील मुलींच्या आशिया चषक क्रिकेट टी-ट्वेंटी  स्पर्धेत बांग्लादेशला पराभूत करत चषक पटकावला आहे.मलेशियाच्या क्वालालंपूर इथं आज सकाळी झालेल्या या सामन्यात,बांग्लादेशनं नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी केली.भारतानं वीस षटकांत सात बाद ११७ धावा केल्या.प्रत्युत्तरात बांग्लादेशचा डाव एकोणीसाव्या षटकाचे तीन चेंडु शिल्लक असतांना सर्वबाद ७६ धावांवरच आटोपला.सामनावीरचा किताब भारताची सलामीवीर फलंदाज गोंगादी तृषा , हिला देण्यात आला . अशिया खंडातील आघाडीच्या सहा संघांचा समावेश असलेल्या या स्पर्धेत भारतानं आपले सर्व सामने जिंकल्याची कामगिरी केली आहे.

****

भारत-वेस्टइंडीज,महिला संघांदरम्यान आईसीसी चैंपियनशिप क्रिकेट एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेला आज प्रारंभ होत आहे.आजचा पहिला सामना गुजरातच्या बडोदा इथं आता थोड्याच वेळात दुपारी दीड वाजता सुरु होईल.

****

मुंबईत आयोजित ७९व्या पश्चिम भारतीय स्क्वॅश स्पर्धेत महिला एकेरीच्या अंतिम फेरीत अनाहत सिंह विरुध्द् आकांक्षा सालुंखे असा दोन्ही भारतीच्याच खेळाडुंमध्ये सामना रंगणार आहे. आज दुपारी पावणेतीनला सामना सुरु होईल.

****